# द मर्सिलेस किलर

लेखक

**जेम्स हॅडली चेस**

स्वैर अनुवाद

**मधुकर हुद्दार**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B 279

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**द मर्सिलेस किलर : मधुकर हुद्दार**
© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
डिसेंबर, २०१३

**किंमत**
₹ १५०/-

# द मर्सिलेस किलर

# एक

शेरीफ रॉस पोटभर जेवण करून उठला व समाधानाचा भाव चेहऱ्यावर आत धप्प करून आपल्या आरामखुर्चीत बसला. तो चांगलाच गलेलठ्ठ होता. त्याचे केसाळ हात गोलमटोल होते. पोटाचा आकार शरीराला शोभणारा होता. त्याच्यासमोर टी.व्ही.सेट होता; परंतु त्याकडे दुर्लक्ष करीत तो म्हणाला.

''आजचं जेवण मस्त झालंय मेरी. तू सुग्रण आहेस. छान करतेस स्वयंपाक.''

''थँक्स.'' जेवणाच्या डिशेस धूत ती म्हणाली, ''माझी आई माझ्यापेक्षा चांगला करायची. माझा फारसा वाईट होत नाही, हे खरंय, कारण तुम्ही आवडीनं जेवता. हो ना?''

''ऑफ कोर्स. शंकाच नाही.'' रॉस म्हणाला. मेरीनं खिडकीतून बाहेर पाहिलं. मुसळधार पाऊस पडत होता. बंगल्याच्या छपरावर पावसाच्या धारा थाडऽ थाड आपटत होत्या.

''हा कसला मेला पाऊस. झोपेचं खोबरं,'' मेरी वैतागून म्हणाली.

''खरंय,'' रॉसनं तिची री ओढली.

रॉसचं वय त्रेपन्न वर्षाचं होतं. भव्य, भरभक्कम शरीर, उन्हात रापलेला असला, तरी मोहक चेहरा, असं त्याचं वजनदार व्यक्तिमत्त्व होतं. डोक्यावर पडलेलं टक्कलही त्याला शोभून दिसायचं. त्यानं पाईप पेटवला अन् धूर सोडत डोळे मिटले. मन सुखी असलं की, असंच होतं. त्याने डोळे उघडून मेरीकडे

पाहिलं, त्याच्या डोळ्यांत मेरीचं-बायकोचं कौतुक होतं. प्रेम, जिव्हाळा, आपलेपणा, हे सर्व भाव त्याच्या डोळ्यांत दिसत होते. रॉस व मेरीचं लग्न तीस वर्षापूर्वीच झालं होतं. त्याला आठवलं, लग्नाचे वेळी तिचे केस काळेभोर, लांब सडक होते. ती देखणी होती व आताही किंचित फरकाने मेरी तशीच दिसते, याचा त्याला अभिमान वाटला. वयाप्रमाणे दिसण्यात फरक पडतोच. पण तरीही तिची मोहकता त्याला सावरून धरायला पुरेशी होती. यामुळे गेली तीस वर्षे त्यांचा संसार सुखासमाधानानं सुरू होता.

रॉसचं बालपण सर्वसामान्य मुलाप्रमाणेच गेलं; परंतु शाळेच्या अंतिम वर्गात असताना, त्याच्या मनात मिलिटरी पोलिस होण्याची आकांक्षा जागृत झाली. यासाठी त्याने शाळा सोडली व सैन्यात प्रवेश केला. तो पोलीस झाला. युद्धाच्या दरम्यान त्याला अनेक साहसी अनुभवांतून जावे लागले. शेवटी युद्ध संपले, आणि तो हायवे पेट्रोल ऑफिसर झाला व त्याचा संबंध मियामी हेडक्वार्टरशी होता. त्याची कार्यप्रवणता व एकूणच वागणं इतकं चांगलं होतं की, तो सर्वांचा आवडता झाला, विश्वासार्ह ठरला. यामुळेच त्याला रॉकव्हिलेचा शेरीफ म्हणून बढती मिळाली. रॉसच्या कर्तृत्वाचं चीज झालं. नुसतं सद्गुणी राहून भागत नाही. नशिबाची साथही लाभावी लागते. रॉसच्या नशिबी या दोन्ही गोष्टी होत्या. रॉसला व मेरीला रॉकव्हिलेचं वास्तव्य मानवलं. आवडलं.

रॉसला जो पगार मिळे, त्यात तो व मेरी समाधानी होते. त्यांचं जीवनमान साधंच होतं, मेरीला पतिप्रेमापलीकडे काही नको होतं. दागिने व कपडे, हॉटेलिंग याची अवास्तव छळवादी आवड असणाऱ्यांपैकी ती नव्हती.

रॉसला बंगला त्याच्या ऑफिसला लागूनच होता. बंगल्याचं एक दार उघडून तो आपल्या ऑफिसात जात असे.

रॉकव्हिले हे स्थळ उत्तर फ्लोरिडात होतं. या ठिकाणी शेतकऱ्यांची वस्ती होती. अंदाजे आठशे कार्यरत व सेवानिवृत्त फार्मर्स इथे रहात. काही चळवळे, उधमी तरुण दक्षिण फ्लोरिडात जात व अधूनमधून रॉकव्हिलेकडे पावले वळवीत. इथं थोडी उलथापालथ करून त्यांचा मोर्चा पुन्हा दक्षिण फ्लोरिडाकडे वळत असे.

रॉकव्हिलेमध्ये एक सर्व्हिस स्टोअर, एक बँक, एक गॅरेज, एक लहानसे चर्च व एक शाळा होती. इथे लाकडाचे बंगले बरेच होते. गुन्हेगारीच्या दृष्टीने विचार

केला तर हा भाग निश्चिंत होता. खून, दरोडे असे गुन्हे रॉकव्हिलेमध्ये कधी घडत नसत. लहान मुले सर्व्हिस स्टोअरमधून एखादी वस्तू लांबवत, कधी एखाद्या दारुड्याला धिंगाणा घालताना शांत करावे लागे, तर हायवेवरून जाणारे हिप्पी किंवा गुंड प्रवृत्तीच्या लोकांना मार्गी लावण्याची पाळी येत असे. एकूण सगळं शांत होतं.

रॉससाठी अशा गोष्टी हाताळणं सर्वसाधारण बाब होती. त्याला मदत करायला एक डेप्युटीही नेमला गेला होता. रॉसच्या मते, त्याची काहीच गरज नव्हती. तो फार्मवर काम करणाऱ्या काळ्या कामगारांशी गप्पा मारी किंवा हायवेवरून नियमबाह्य वेगाने कार चालविणाऱ्यांना अडवून त्यांना चालान करी. या पलीकडे त्याला काम नसे. टॉम मेसन हा डेप्युटी शेरीफ तरुण व देखणा होता. रॉस व टॉम आठवड्यातून दोनदा बुद्धिबळ खेळत असत. एकालाही धड खेळता येत नसे. त्यामुळे केव्हा कुणी हरायचं हे त्यांनी आपसात ठरवून घेतलं होतं. बुद्धिबळातलं गम्य कुणालाच नव्हतं. हा एक टाईमपास होता.

रॉसने पाय लांब पसरून पाईपमधून लांब झुरका मारला अन् मेरीला विचारलं,

''मेरी, डिश वॉशिंगमध्ये मदत करायला येऊ का? मला चांगलं जमतं हे काम.''

''काही गरज नाही. मला बरं नव्हतं तेव्हा चार डिशेसचे बारा वाजवले. तुम्ही धूर सोडत बसा. किचनमध्ये यायची गरज नाही.''

रॉस हसला. मेरी असंच काहीतरी बोलणार याची त्याला खात्री होती. बाहेर कोसळणारा पाऊस सकाळपर्यंत थांबेल असा त्याचा अंदाज होता. मनातल्या मनात तो देवाला म्हणत होता की, या घनमार पावसात बाहेर जाण्याचा प्रसंग येऊ देऊ नकोस. मी, माझा पाईप अन् माझी मेरी, बस मजेत रात्र घालवू. पण? प्रत्येक गोष्ट आपल्या मनासारखी घडू शकत नाही. तसं झालं असतं तर जगातला प्रत्येक माणूस सुखी झाला असता. रॉइ पाईपमधली राख झटकत असतानाच फोनची बेल खणखणली अन् रॉइसच्या कपाळावर आठ्यांचं जाळं विणलं गेलं. तो नाईलाजानं उठला व त्यानं रिसीव्हर कानावर ठेवला. त्याला चिरपरिचित आवाज ऐकू आला.

''जेफ, एक भयानक घटना घडली आहे.''

''कार्ल, आजची रात्र कशी आहे, तू पाहातो आहेस ना? गडद अंधार आणि मुसळधार पाऊस. आता कोणतं संकट कोसळलंय?'' रॉसने विचारलं.

कार्ल जेनर हा हायवे पेट्रोलिंग विभाग प्रमुख होता, तरीही रॉसनं त्याला काय भानगड आहे म्हणून विचारलंच.

''जेफ, वेळ आणीबाणीची आहे. पोलीस डिपार्टमेंट हादरवून सोडणारी आहे. सर्व तपशील सांगत बसायला माझ्याजवळ वेळ नाही. मी सर्व स्थानिक शेरीफांना तातडीनं बोलावलं आहे. एक कैदी जेलमधून पळाला आहे.''

''बापरेऽ नाव काय त्याचं?''

''चेट लोगन. त्याला व्हॅनमधून ॲबिव्हिले जेलमध्ये नेत असताना अपघात झाला. यात चेट लोगनबरोबर असलेले दोन्ही पोलीस ठार झाले. या संधीचा फायदा घेऊन लोगन फरार झालाय.'' हा अतिभयानक, क्रूर, खुनी गुन्हेगार आहे. तो तुझ्या विभागाकडेच पळाला असणार. तू सर्व फार्म हाऊसवाल्यांना ही बातमी कळव अन् अलर्ट राहायला सांग, कारण हा कैदी महाभयानक आहे.''

रॉसचा श्वास ही बातमी ऐकून घशात अडकल्यासारखा वाटला. तरीही त्याची कर्तव्यातभावना जागृत झाली अन् तो म्हणाला,

''ठीकाय. क्लार्क मी हा निघालोच.''

''ठीक. पण या गुन्हेगाराचं वर्णन मी करतो ते नीट ऐक. चेट लोगन हा पाच फूट दहा इंच उंच आहे. बळकट बलदंड शरीर, तांबटरंगी केस, वय तेवीस अन् त्यानं आपल्या डाव्या हाताच्या दंडावर सापाचा आकार गोंदवून घेतला आहे. सुमारे तासाभरात त्याचं संपूर्ण वर्णन टी.व्ही. अन् रेडिओवर प्रसारित होणार आहे. त्याने निळी जीन्स व लालसर रंगाचा शर्ट घातलेला आहे. कदाचित ओळखू नये म्हणून त्याने वेशांतरही केलं असेल. हा गुन्हेगार सापापेक्षा जास्त विषारी आहे. तो त्याच्या आड येईल त्याची चिरफाड केल्याशिवाय तो शांत होत नाही. एक गॅस स्टेशन जाळण्याच्या प्रयत्नात तो पकडला गेलाय. पण एका पेट्रोल ऑफिसरने त्याला अरेस्ट करण्याचा प्रयत्न केला असताना चेट लोगनने त्याच्या पोटात, छातीत चाकू खुपसून त्याला ठार मारलं. गॅस कर्मचाऱ्याचा तर त्याने चाकूने शिरच्छेदच केला व पेट्रोल ऑफिसरची मोटार सायकल घेऊन फरार होण्याच्या प्रयत्नात असतानाच तो पकडला गेला.

ठार झालेल्या पेट्रोलिंग ऑफिसरने लोगनच्या संशयास्पद हालचालीबद्दल इतर दोन तीन ऑफिसरांना कळवलं होतं. ते तात्काळ घटनास्थळी पोहोचले व तिघांनी मिळून लोगनला ताब्यात घेतलं. या आपला एक अधिकारी ठार झाला, हे वाईट झालं. तू माझ्या सोबत आहेस ना?''

''मी तुमच्या सोबत आहेच. डोन्ट वरी सर.''

रॉस गंभीर झाला होता. बरेच वर्षानंतर ही आणीबाणी उद्‌भवली होती. त्याने क्लार्कला विचारलं.

''सर, अजून काही सूचना आहेत का?''

''मला एक शक्यता वाटते. हा फरार खुनी जवळपासच्या फार्म हाऊसमध्ये शिरून एखादी गन मिळविण्याचा प्रयत्न करेल. त्याच्या हिंसक वृत्तीला अधिक बळ मिळेल. त्यामुळे फार्म हाऊसमध्ये राहाणाऱ्यांना सतर्क करायला या क्रूरकर्म्याची माहिती सांगणं आवश्यक आहे. तू निघ मग एकत्र विचार करू.''

''यस सर,'' म्हणून रॉसने फोन ठेवला. त्याच वेळी मेरी जवळ आली अन् तिनं विचारलं,

''काही विशेष?''

''क्लार्कने मला सांगितलंय की, एक भयानक क्रूर कैदी फरार झाला आहे. त्यामुळे मला जाणं भाग आहे. पण तू काळजी करू नकोस. मी एकटा नाही. सर्वच लोकल शेरीफ माझ्यासोबत राहतील. मला गरम कॉफी दे. मग मी कामगिरीवर निघतो.''

''आत्ता आणते,'' असं म्हणून तिनं पहिले समोरच्या दाराला कुलूप लावलं. नंतर मागच्या दाराची खिटी लावली व आश्वस्थ झाल्यानंतरच ती किचनमध्ये गेली. तिने किटली गॅसवर ठेवली.

रॉसने तोवर त्याच्या भागातील फार्म हाऊसचे टेलिफोननंबर लिहून एक यादी तयार केली.

यावेळी ९.३० वाजले होते. रॉसचा सहायक टॉम मेसन आपल्या घरी केरी स्मिजबरोबर रोमॅन्टिक मूडमध्ये आरामात पहुडला होता. एवढ्यात फोनची बेल वाजली अन् वैतागून त्यानं फोन घेतला. फोनवर फरार कैद्याची माहिती ऐकून

टॉमने शिकारी कुत्र्यासारखी उडीच मारली. स्थानिक पोस्ट ऑफिसात केरी काम करीत होती. तिने काय झालं म्हणून विचारलं.

''काही नाही. ड्युटीवर जावं लागेल. रॉसचा फोन होता. इमरजन्सी आहे म्हणे.'' टॉमने युनिफार्म व रेनकोट घातला. लॉंगबूट घालून रिव्हॉल्व्हर असलेला होलस्टर बेल्ट कमरेला कसून तो तयार झाला. केरी वैतागून म्हणाली,

''मी काय करू? एवढ्या मुसळधार पावसात घरी कशी जाऊ?''

''मग इथंच राहा. पाऊस थांबल्यावर जा. मला तर जायलाच हवं.''

एवढं बोलून टॉमनं आपल्या जीपला गॅरेजमधून काढलं; अनं वेगानं पावसात चालवत पाच मिनिटात तो शेरीफसमोर हजर झाला. पावसाचा जोर इतका होता की, त्याला मान वाकवून आत प्रवेश करावा लागला. रेनकोट ओला चिंब झाला होता. टॉमने तो बाहेरच झटकला अन् नंतर तो शेरीफसमोर उभा राहिला.

''जीपमधून ऑफिसात येईपर्यंत इतका ओला झालास?'' रॉस.

''मग काय बाहेर आभाळ फाटलंय.''

रॉस फोनवर बोलत होता. टॉमला पाहून त्यानं फोन ठेवला व टॉमकडे वळून म्हणाला,

''आजची रात्र भयानक आहे.''

''आहे खरी. पण इमरजन्सी कोणती उद्‌भवली? मी फोनवर मुद्दामच विचारलं नाही.''

''जेनरने सांगितलं फोनवर की, एक भयानक खुनी कैदी लॉसव्हिलेकडे नेला जात असताना पावसामुळे ड्रायव्हरचा अंदाज चुकला व व्हॅन झाडावर आदळून अपघात झाला. ही संधी साधून कैदी फरार झाला. तो आपल्या दिशेनेच येत आहे असा जेनरचा कयास आहे. त्याने मला सांगितलंय की, आपल्या भागातील सर्व फार्म हाऊसच्या मालकांना कळव की आपल्या गन्स लपवून ठेवा, दारं खिडक्या बंद करा अन् बाहेर पडू नका. हा कैदी महाभयानक, शक्तिशाली अन् अतिशय क्रूर आहे. आपल्या एका ऑफिसरला गॅस स्टेशनवर त्यानं चाकूनं ठार मारलंय. गॅस असिस्टन्टचा तर त्याने चाकूने शिरच्छेदच केला. ही यादी तू घे अन् फार्मर्सना त्याचं वर्णन कळव. मी माझ्या फोनवरून